# ज्योतिर्मय

Online Journal of Literature....

साहित्याचे विद्यापीठ

❑ पुणे ❑ वर्ष १ ले ❑ अंक ४० वा ❑ गुरूवार दि.१३ मार्च २०२५ ❑ पाने ४ ❑ मूल्य : निशुल्क (खासगी वितरणासाठी)


विशेष लेख...

## काही देश त्यांचे नागरिकत्व का विकतात?

– प्रा डॉ सुधीर अग्रवाल

**ज्योतिर्मय साहित्य**

अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी अलीकडेच गोल्ड कार्ड व्हिसा ही नवीन व्हिसा योजना जाहीर केली आहे. ही योजना प्रामुख्याने श्रीमंत गुंतवणूकदारांना लक्षात घेऊन तयार करण्यात आली आहे जे अमेरिकन अर्थव्यवस्थेत मोठी गुंतवणूक करू शकतात आणि त्या बदल्यात ग्रीन कार्ड आणि कायमचे नागरिकत्व मिळवू शकतात. या व्हिसासाठी किमान गुंतवणूक ५ दशलक्ष डॉलर्स (सुमारे ४४ कोटी रुपये) ठेवण्यात आली आहे.

तथापि, हे काही नवीन नाही. अनेक देश गोल्डन पासपोर्ट योजनेअंतर्गत श्रीमंत गुंतवणूकदारांना नागरिकत्व आणि निवास हक्क देत आहेत. अमेरिकेने आपल्या देशाचे नागरिकत्व विकायला काढले आहे. ज्यांना अमेरिकेचे नागरिकत्व पाहिजे त्यांनी गोल्डनकार्ड व्हिसा अंतर्गत ४४ कोटी रुपये भरून अमेरिकेचे नागरिकत्व मिळवू शकतो.

केवळ अमेरिकाच नागरिकत्व विकते असे नाही तर जगातील छोटे छोटे देश देखील आपले नागरिकत्व विकतात.

हेन्ले अँड पार्टनर्सच्या मते, सर्वात स्वस्त नागरिकत्व नौरूमध्ये उपलब्ध आहे, जिथे फक्त १.१७ कोटी रुपये (सुमारे १३५,०००) गुंतवून नागरिकत्व मिळू शकते. त्यानंतर डोमिनिका आणि अँटिग्वा-बार्बुडा येतात, जिथे नागरिकत्वासाठी १.७५ कोटी ते २ कोटी रुपये (२००,००० - २५०,००० डॉलर्स) खर्च करावे लागतात. त्याच वेळी, तुर्कीचे नागरिकत्व मिळविण्यासाठी, सुमारे ३.५ कोटी रुपये (४००,०००) गुंतवावे लागतात.

नागरिकत्व विकणे ही प्रत्येक देशाची आर्थिक रणनीती आहे. अशा गुंतवणुकींमुळे देशाच्या अर्थव्यवस्थेत थेट पैसा येतो, ज्यामुळे सरकारांना पायाभूत सुविधा, आरोग्यसेवा आणि इतर विकास योजनांवर खर्च करण्याची परवानगी मिळते. विशेषतः लहान देश, ज्यांची अर्थव्यवस्था पर्यटन आणि सेवा उद्योगावर अवलंबून आहे, ते नागरिकत्व विकून त्यांचे उत्पन्न वाढवतात. डोमिनिका, अँटिग्वा आणि सेंट किट्स आणि नेव्हिस सारखे कॅरिबियन देश त्यांची अर्थव्यवस्था मजबूत करण्यासाठी नागरिकत्व विकतात.

भारतीय क्रिकेट नियामक मंडळाचे () माजी अध्यक्ष आणि आयपीएलचे संस्थापक ललित मोदी यांनी वानुआतुचे नागरिकत्व स्वीकारले आहे. मोदीने लंडनमधील भारतीय उच्चायुक्तालयात त्यांचा भारतीय पासपोर्ट जमा करण्यासाठी अर्ज केला आहे. परराष्ट्र मंत्रालयानेही फरार ललित मोदीने वानुआतूचे नागरिकत्व घेतल्याची पुष्टी केली आहे. मोदींचे कायदेशीर सल्लागार मेहबूब अबादी म्हणाले की, भारतीय पासपोर्ट परत करण्यासाठी विहित प्रक्रियेनुसार सर्व आवश्यक पावले उचलण्यात आली आहेत. वानुआटु हा दक्षिण प्रशांत महासागरातील एक लहान बेट देश आहे. ललित मोदी वानुआटुचे नागरिक झाल्यानंतर, त्यांना भारतात परत आणणे सरकारसाठी अधिक कठीण होईल. वानुआटु एका गुंतवणूक कार्यक्रमांतर्गत आपले नागरिकत्व विकते. टॅक्स हेवन देश असल्याने, या बेट देशाचे नागरिकत्व मिळविण्याचा ट्रेंड गेल्या काही काळापासून वाढत आहे.

सुमारे १ कोटी रुपये खर्च करून तुम्ही वानुआटुचे नागरिक होऊ शकता. तुम्ही आणि तुमचे कुटुंब १.५ कोटी रुपयांमध्ये वानुआटुचे नागरिक होऊ शकता. हा देश त्याच्या जलद नागरिकत्व प्रक्रियेसाठी ओळखला जातो. गुंतवणूक कार्यक्रमांतर्गत पैसे जमा केल्यानंतर सात आठवड्यांच्या आत ते नागरिकत्व देते. ५५ देश वानुआटु पासपोर्टवर व्हिसा-मुक्त प्रवेश देतात तर ३४ देश आगमनानंतर व्हिसा सुविधा देतात. जर एखादी व्यक्ती १० वर्षांपासून वानुआटुमध्ये सतत राहत असेल, तर ती व्यक्ती तिथल्या नागरिकत्वासाठी अर्ज करू शकते. जर एखाद्या व्यक्तीने वानुआटुमधील एखाद्या मुलाशी किंवा मुलीशी कायदेशीररित्या लग्न केले असेल किंवा गेल्या २ वर्षांपासून एकत्र राहत असेल, तर तो किंवा ती नागरिकत्वासाठी अर्ज करू शकते. पण, गुंतवणुकीद्वारे नागरिकत्व हा वानुआटुचा नागरिक बनण्याचा सर्वात सोपा मार्ग आहे.

भारतीयांसाठी सर्वात लोकप्रिय देश

भारतीय गुंतवणूकदारांमध्ये तुर्की, पोर्तुगाल आणि कॅनडा हे सर्वाधिक लोकप्रिय आहेत.

तुर्की : भारतीय गुंतवणूकदार ३.५ कोटी रुपये गुंतवून तुर्कीचे नागरिकत्व मिळवू शकतात. येथून ते ११०+ देशांमध्ये व्हिसाशिवाय प्रवास करू शकतात.

पोर्तुगाल : भारतीयांसाठी आकर्षक कारण येथे ५ वर्षांच्या आत नागरिकत्व मिळू शकते.

कॅनडा: कायमस्वरूपी निवास (पीआर) स्वरूपात गुंतवणुकीच्या बदल्यात नागरिकत्वाची संधी देते.

याशिवाय माल्टा,तुर्की, अँटिगा बर्मुडा, डॉमिनिका, इजिप्त या देशांमध्येही नागरिकत्व विकत घेता येऊ शकते.

# ‘महाराष्ट्र भूषण पुरस्कार २०२४’ लवकरच जाहीर करणार-मुख्यमंत्री

**ज्योतिर्मय साहित्य**

**मुंबई** – ‘महाराष्ट्र भूषण पुरस्कार २०२४’ साठी राज्यातून प्राप्त शिफारस प्रस्तावातील सर्व मान्यवरांचे महाराष्ट्रासाठी अत्यंत मोलाचे योगदान आहे. ‘महाराष्ट्र भूषण पुरस्कार २०२४’ अंतिम निर्णय हा सर्व संबंधितांशी विचारविनिमय करून लवकरच जाहीर करणार असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले.



विधानभवन येथे ‘महाराष्ट्र भूषण पुरस्कार २०२४’ निवड समितीच्या बैठकीत मुख्यमंत्री फडणवीस बोलत होते. या बैठकीला उपमुख्यमंत्री अजित पवार, सांस्कृतिक कार्य मंत्री ॲड. आशिष शेलार, सांस्कृतिक कार्य विभागाचे अपर मुख्य सचिव विकास खारगे, मुख्यमंत्री कार्यालयाच्या प्रधान सचिव अश्विनी भिडे, सचिव डॉ.श्रीकर परदेशी, सांस्कृतिक कार्य विभागाचे संचालक बिभीषण चवरे, महाराष्ट्र भूषण पुरस्कार निवड समितीचे अशासकीय सदस्य डॉ. अनिल काकोडकर, दूरदृश्यप्रणालीद्वारे महाराष्ट्र भूषण पुरस्कार निवड समितीचे अशासकीय सदस्य ॲड. उज्ज्वल निकम, वासुदेव कामत, गो. ब. देगूलकर, डॉ. शशिकला वंजारी यासह इतर अधिकारी उपस्थित होते.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, महाराष्ट्र भूषण पुरस्कार हा महाराष्ट्रातील सर्वोच्च नागरी सन्मान असून हा पुरस्कार कोणत्याही क्षेत्रात निरपेक्ष वृत्तीने सेवा करणाऱ्या तसेच त्याद्वारे मानवी जीवन उंचावण्यासाठी उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्तीला देण्यात येतो. ‘महाराष्ट्र भूषण पुरस्कार २०२४’ पुरस्कारासाठी शासनाला प्राप्त शिफारस प्रस्तावापैकी एकाची निवड करणे अत्यंत कठीण काम आहे. पुरस्कार निवड समिती सदस्यांनी सुचविलेली नावे लक्षात घेवून असून लवकरच हे पुरस्कार सर्व संबंधितांशी विचारविनिमय करून जाहीर करण्यात येतील.

सांस्कृतिक कार्य विभागाचे अपर मुख्य सचिव विकास खारगे यांनी याबाबत सादरीकरण केले. महाराष्ट्र भूषण पुरस्कार निवड समितीचे अशासकीय सदस्य यांनी पुरस्कारासाठी निवड याबाबत मते मांडली.

# आरंभ सक्षम पुरस्काराचे थाटात वितरण

## राजेश्वरी किशोर आणि प्राची गुर्जर पुरस्काराच्या मानकरी

**ज्योतिर्मय साहित्य**

**छत्रपती संभाजीनगर** – आरंभ स्वमग्न व गतिमंद मुलांच्या संस्थतर्फे दरवर्षी जागतिक महिला दिनाच्या निमित्ताने ‘‘आरंभ- सक्षम‘‘ पुरस्काराने दिव्यांग साठी काम करणार्या संस्थेला आणि दिव्यांग मुलाचा सांभाळ करत संघर्ष करत उभी राहणाऱ्या मातेला सन्मानित केले जाते. इंडियन मेडिकल असोसिएशनच्या सभागृहात मान्यवरांच्या उपस्थित आज पुणे येथील विशेष मुलीची माता राजेश्वरी किशोर आणि अंध व्यक्तींसाठी ऑडीओ ग्रंथालय उभारणाऱ्या प्राची गुर्जर यांना सन्मानपूर्वक मान्यवरांच्या हस्ते पुरस्काराचे वितरण करण्यात आले.




आरंभ सक्षम पुरस्काराचे हे हे ९ वे वर्ष आहे. ॲड. ज्योती हरिहर पत्की, ज्येष्ठ वकील आणि म.सी.आ. महिला विभाग अध्यक्ष राजश्री कुलकर्णी यांच्या हस्ते मान्यवरांना पुरस्कार वितरण झाले. मानपत्र, मानचिन्ह आणि धनादेश असे पुरस्काराचे स्वरूप आहे. एका विशेष मुलीला वाढवताना आलेले अनुभव कष्टदायक असले तरी ते इतरांसाठी प्रेरणादायी ठरू शकतात. आपल्या कष्टाचे इतरांसाठी ताकद आणि प्रेरणेत रुपांतर करण्याची किमया साधणाऱ्या पुणे येथील राजेश्वरी किशोर आणि अंधांसाठी ५००० पेक्षा जास्त पुस्तकांची यशोवाणी नावाची ऑडीओ लायब्ररी उभारणाऱ्या पुणे येथील प्राची गुर्जर यांचे कार्य या पुरस्काराच्या माध्यमातून मराठवाड्यातील नागरिकांपुढे मांडण्याचा प्रयत्न आरंभ ने केला आहे.

प्रमुख पाहुण्या राजश्री कुलकर्णी यांनी उद्योजकांनी विशेष मुलांच्या रोजगारासाठी प्रयत्न करण्याची गरज आहे. ही एक सामाजिक बांधिलकी असल्याचे आवाहन त्यांनी केले तर ज्योती पत्की यांनी दिव्यांग मुलांसाठी असलेल्या कायद्याची माहिती दिली. तर सत्काराला उत्तर देताना राजेश्वरी किशोर यांनी एक मुलं विशेष आणि दुसरं नॉर्मल असेल तर दोन्ही मुलांना वाढवताना संतुलन संभाळणे खूप अवघड असते. एकाला सांभाळायचे असते तर दुसऱ्याला उडण्यासाठी पंख द्यायचे असतात अशा वेळी आईची कसोटी असते अशा शब्दात आपला प्रवास मांडला. तर प्राची गुर्जर यांनी आपल्या भावना व्यक्त करताना स्वयंसेवकांमुळे यशोवणी उभे राहू शकले आहे. कोणतेही सामाजिक कार्य एकटी व्यक्ती उभी करू शकत नाही तर शेकडो हात समोर येण्याची गरज आहे यशोवाणी च्या यशामागेही असेच अनेक स्वयंसेवक असल्याचे त्यांनी सांगितले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक करताना आरंभच्या संचालिका अंबिका टाकळकर यांनी पुरस्कारामागची भूमिका स्पष्ट करताना दिव्यंगांसाठी काम करणाऱ्या व्यक्ती आणि संस्थांच्या पाठीवर कौतुकाने थाप देण्याची गरज आहे. त्यांचे कौतुक झाल्यास हे कार्य अधिकाधिक नागरिकांपर्यंत पोहचेल असे सांगितले. प्रज्ञा देशपांडे यांनी आरंभची तेरा वर्षाची वाटचाल मांडली. एका विशेष मुलाला वाढवताना प्रेमाने काळजी घेणारी, नोकरी, सांभाळून मुलासाठी झटणारी ते प्रसंगी आपल्या मुलासाठी जगदंबेचे रूप घेणारी खंबीर माता अशी विशेष मुलाच्या आईची विविध रूपे आरंभच्या सुमारे वीस मुलांनी नृत्याच्या माध्यमातून मंचावर सादर केली तेव्हा उपस्थित मान्यवरांनी टाळ्याच्या कडकडाटात त्यांचे स्वगत केले. आरमचे विद्यार्थी कृष्णा केला याने महिला दिन साजरा का केला जातो यासंदर्भात इंग्रजीत भाषण केले तर सागर काथार याने आईव्रील कविता आणि आर्यन जाधवने दिल ही छोटासा गाण्याच्या माध्यमातून स्वमग्न मुलाच्या मनातील भावना व्यक्त केल्या. विविध राज्यांच्या वेशभूषा करून आरंभ मधील माता पालक मंचावर अवतरल्या त्यावेळी भारतातील विविधतेतील एकता साकार झाली.

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी विजयश्री जाईबहार, पल्लवी सोनावणे, अश्विनी वांढेकर, नीलिमा वावरे या शिक्षकांसह, आरंभचे पीआरओ आनंद पोळ, तसेच शोएब शेख, किरण जोशी, सिद्धेश रेवणकर, कल्पना बाविस्कर, रझिया शेख यांनी परिश्रम घेतले. पुरस्कार सोहळ्यास शहरातील विविध क्षेत्रातील मान्यवर तसेच आरंभ चे पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## लक्षवेधी छायाचित्र....



रंग निसर्गाचे..., Ostrich, Masai Mara, Kenya

(छाया: संजय दारमवार, मुंबई)

# ॲड. स्नेहा संजय बोटवे-चपळगांवकर यांना २०२४ या परीक्षेत घवघवीत यश

**ज्योतिर्मय साहित्य**

**छत्रपती संभाजीनगर** – सर्वोच्च न्यायालयाच्या वतीने घेण्यात येणाऱ्या ॲडव्होकेट -ऑन-रेकॉर्ड २०२४ या परीक्षेत छत्रपती संभाजीनगरच्या ॲडव्होकेट स्नेहा संजय बोटवे - चपळगांवकर यांना घवघवीत यश मिळाले. ची परीक्षा ही एक कठीण परीक्षा असते ज्यामध्ये प्रत्येकी १०० मार्कांचे ४ पेपर घेतले जातात.



सर्वोच्च न्यायालयात होणे हे वकिलीच्या क्षेत्रात मानाचे आणि जबाबदारीचे पद मानले जाते कारण की प्रकरण दाखल करण्याचा अधिकार हा फक्त ओर नाच असतो आणि इतर वकिलांना तो अधिकार नसतो. सर्वोच्च न्यायालयाच्या स्थापनेपासून ते आजपर्यंत फक्त ४२०३ आहेत. स्नेहा ह्या गेल्या ३ वर्षांपासून नवी दिल्ली येथे सर्वोच्च न्यायालयात प्रैक्टिस करीत आहेत. त्यांचे पती ॲड. सिद्धार्थ सारंगराव चपळगांवकर हे देखील वकील असून सर्वोच्च न्यायालयात वकिली करतात. स्नेहाचे शालेय शिक्षण संभाजीनगरच्या पब्लिक स्कूल येथे झाले तर त्यांनी कायद्याचे शिक्षण माणिकचंद पहाडे महाविद्यालय येथून पूर्ण केले. तसेच डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, संभाजीनगर येथून त्यांनी कायद्याचे पदव्युत्तर शिक्षण घेतले. कायद्याचं शिक्षण घेताना त्यांनी अनेक उपक्रमांमध्ये स्पर्धांमध्ये सहभाग घेतला. अभिरुप न्यायालय स्पर्धा, पोस्टर प्रदर्शन स्पर्धा, पथ नाट्ये इ. साठी त्यांनी महाविद्यालयाचे प्रतिनिधित्व केले. नवी दिल्ली येथे वकिली सुरू करण्यापूर्वी त्यांनी मुंबई उच्च न्यायालय छत्रपती संभाजीनगर विधी सेवा विभागात तसेच मुंबई येथे कंपनी कायदा प्राधिकरणात संशोधक म्हणून काम केले. त्यासोबतच मुंबई येथील एका प्रथितयश कॉर्पोरेट फर्म मध्ये काम करण्याचा देखील त्यांचा अनुभव राहिलेला आहे. त्यांच्या कुटुंबामध्ये वकिलीची कोणतीही पार्श्वभुमी नसतानादेखील छत्रपती संभाजीनगर आणि माणिकचंद पहाडे विधी महाविद्यालय येथून एक महिला वकिल म्हणून सर्वोच्च न्यायालयाच्या होण्याचा दुर्मिळ मान स्नेहा बोटवे यांनी मिळविल्याबद्दल त्यांचे सर्वत्र अभिनंदन होत आहे.



– विद्यावाचस्पती विद्यानंद
Mobile: +917709612655
Email: vidyavachaspati.vidyanand@gmail.com



आनंदी पहाट...


## श्वास आणि विश्वास दोन्हीही महत्त्वाचेच

ज्योतिर्मय साहित्य

आपल्याला आयुष्य जगण्यासाठी जसा श्वास गरजेचा असतो, तसाच आपल्या आयुष्यात जगण्यापलीकडचे जीवन जगण्यासाठी विश्वास महत्वाचा असतो. आपल्या जीवनांत आपल्याला लाभलेले जाज्वल्य हे फक्त श्वास-विश्वासावरच अवलंबून, टिकून रहात असते. श्वसन प्रकाराच्या उपयोगातून आपले जगणे अधिक सुलभ, सुरक्षित आणि सुंदर करणे आपल्यावरच अवलंबून असते. जितका मोठा श्वास घेतला जातो तितकेच आयुष्य मोठे, दीर्घ होत जाते. ह्या श्वासावर नियंत्रण करण्याचे शास्त्र आपण अवगत केले, कि समजायचे, आपण आपल्या जगण्यावर विजय मिळवला. खरे तर अगदी सहज आणि नकळत घेतलेल्या श्वासाचे किती महत्व असते, हे समजून घेण्याची जाणीव होणे जरुरीचे असते.

नकळत केलेल्या अनेक गोष्टी आपल्याकडून अनेकदा दुर्लक्षित रहात असतात. श्वास आणि विश्वासाचे देखील तसेच असते. श्वास-विश्वासाच्या बाबतीत खरेच आपण नेहमीच गाफील रहात असतो, हीच खरी उणिव म्हणावी लागेल. अनेकदा आपल्या बाबतीत जसे श्वासाचे, तसेच विश्वासाचे सुद्धा असते. आपण अगदी सहजपणे केवळ दृश्य पण आभासी जगावर आंधळेपणाने विश्वास टाकत असतो. आपल्या डोळ्यांवर चढलेली विश्वासाची झापडे आपल्याला भ्रमांत अडकवतात. आपल्याला अगदी नुकत्याच भेटलेल्या व्यक्तीबरोबर, एखाद्या योजनेसाठी, जाहिरातींना भुलून जाऊन आपले सर्वस्व सुद्धा अर्पण करायला तयार होतो. अगदी काही क्षणांत, काही काळांत आपण त्यांवर विश्वास ठेवतो आणि व्यवहार करून मोकळे होते. पण हे मोकळे होणे आपला खिसा, तिजोरी देखील मोकळे करत आहे ह्याची जाणीवही होत नाही. आपण म्हणतो, कि आपण माणसे ओळखायला चुकत नाहीत म्हणून; परंतू त्याच माणसांचे मन ओळखू शकत नाहीत, हीच शोकांतिका ठरते.

## जे तुझ्याचसाठी होते...




ज्योतिर्मय साहित्य

काही गाणी मनाला स्पर्शून जातात. तसेच हे गीत. जे तुझ्याचसाठी होते केवळ फुलले, वाटेत तुझ्या मी फुल ठेवुनी गेले. परवा सहज रेडिओ लावला आणि हे गीत कानावर पडले. यापूर्वीही मी हे गाणं ऐकलं होतं. पण ते पुन्हा खूप दिवसांनी ऐकायला मिळालं. पूर्वी मला त्यातली न जाणवलेली गोडी, आर्तता, तरल भावना सगळं सगळं काही मनाला स्पर्शून गेलं. मंगेश पाडगावकरांची ही अवीट गोडीची रचना. त्या शब्दांना जिवंत केलं आहे उषा मंगेशकर यांनी. या गीताला संगीताची सुरेल साथ आहे संगीतकार विश्वनाथ मोरे यांची.

कविता नसती तर मानवी जीवन किती निरस झाले असते ? या अशा सुंदर गीतातून स्रवणारा मकरंद कधी चाखायला मिळाला असता ? गीत आणि संगीत आणि साहित्य म्हणजे मानवाला मिळालेलं दैवी वरदानच आहे. एका उच्च प्रकारच्या आनंदाची अनुभूती देण्याचं सामर्थ्य त्यात आहे. मानवी भावना, जाणिवा समृद्ध करण्याचं सामर्थ्य त्यात आहे. वाटेत तुझ्या मी फुल ठेवुनी गेले... या गीताचे शब्दच फार गोड आहेत. कधी कधी आपल्याला खूप आवडणारी एखादी प्रसिद्ध व्यक्ती असते. आपण नकळतच अशा व्यक्तीवर प्रेम करायला लागतो. पण अशा व्यक्तीला त्याची खबरबात सुद्धा नसावी ? ही प्रीती ( प्रेमापेक्षाही आणखी सुंदर तरल भावना हा शब्द व्यक्त करतो ) अबोल असते. व्यक्त करता येत नाही. सगळ्यांना सांगता येत नाही. यात असते ते केवळ समर्पण ! हृदयातील देव्हाऱ्यात मांडलेली आपल्या देवाची अबोल पूजा. पहिल्या दोन ओळीत ती विरहिणी आपली व्यथा मांडते, ते शब्द इतके बोलके आहेत की हृदयाचा ठाव घेतल्याशिवाय राहत नाहीत.




जे तुझ्याचसाठी होते केवळ फुलले
वाटेत तुझ्या मी फुल ठेवुनी गेले.

एखादं फुल परमेश्वराच्या चरणीच अर्पण होण्यासाठी उमलावं. तेच त्याचं जीवनध्येय आणि जीवनातील इतिकर्तव्यता असावी. तशीच ही एकतफी, अबोल प्रेम करणारी प्रेयसी. जणू तिचा जन्मच त्याच्यावर प्रेम करण्यासाठी झाला ! त्याला त्याची जाणीव असो वा नसो, ती त्याच्यावर प्रेम करत राहणार. ती म्हणते, ''वाटेत तुझ्या मी फुल ठेवुनी गेले '' हे फुल म्हणजे तिच्या हृदयाचं प्रतीक. पुढे ती आपल्या भावना व्यक्त करताना म्हणते

रथ ऐश्वर्याचा या वाटेने गेला
जयघोष तुझा मग सर्व जगाने केला
मी दूर एकटी, माझे डोळे ओले...

त्या प्रसिद्ध व्यक्तीवर ज्याच्यावर तिचे मनापासून प्रेम आहे, त्याचं जीवन ऐश्वर्यसंपन्न आहे. त्याची वाटचाल, त्याचा मार्ग वेगळाच आहे. त्या मार्गावर सगळेच त्याचा जयघोष करताहेत. हिच्याकडे लक्ष कसे जाणार ? ती तर दूर एकटी एका कोपऱ्यात उभी आहे. जिने आपल्या जीवनाचं फुल त्याच्या पायी ठेवलं, त्याला त्याची जाणीव नाही. जाणीव होण्याचीही शक्यता नाही. या तिच्या अबोल भावना त्याच्यापर्यंत कशा पोहोचणार ? तिच्या डोळ्यात पाणी आहे. **(क्रमश:)**



## दासबोध स्तवन



उज्वला धर्माधिकारी,
पुणे, मो. ७५८८२ ३५६४६

## सद् विद्या निरूपण

ज्योतिर्मय साहित्य

समास आठवा
श्री गणेशाय नमो नम:
श्री शारदा माता नमो नम:
समर्थानी आदर्श पुरूषाची लक्षणे या समासात सांगीतली आहेत.

१)सत्वगुण...। मानवी जीवनातील अध्यात्म्याला पोषक जे जे आवश्यक आहे ते ते स्विकारणारी ही माणसं असतात.

२)रजोगुणी....। मानवी जीवनात देहसुखाला अनुकूल असणारी सर्व व्यवधाने या लोकांना हवी असतात.


३)तमोगुण किंवा कुविद्या....। स्वार्थी व हिंसक असतात. हीन असतात.

वरील तीनही वर्गातील लोकांचा अभ्यास या आधीच आपण केला आहे त्यामुळे या समासात मी पुन्हा सांगत नाही. तेव्हा सदविद्येचा समास वाचत असताना माझ्या असे लक्षात आले की प्रभु रामचंद्रा कडे ही सर्व लक्षणे आहेत. तो मर्यादा पुरषोत्तम आहे. प्रभुरामराया असेल तिथे सितामाई असणारच आणी लक्ष्मण हा तर रामाची सावली आहे. हे एवढे असले तरी ऐक नाव सांगितल्या शिवाय रहावत नाही ते म्हणजे आज्ञा शिरसावंद मानणारा शिष्य मारूती रायाची आठवण आल्याशिवाय रहात नाही . कितीही युगे ऊलटली तरी राम व रामाच्या परिवारातील ईतर सर्वाचा आदर व आदर्श ऐक इंचही कमी होत नाही. ऊलट तो वरचे वर वाढतचं आहे. कल्याण करणारा राम आहे म्हणूनच जीवनात आराम आहे.

सद् विद्येच्या पुरुषाची लक्षणे पाहुया.

जर मन चांगले असेल तर सद् विद्या अंगी बाणवता येते. या साठी निष्ठा असावी, सत्वगुणांनी परिपूर्ण असुन,शालीन क्षमाशील असतो, कोणत्याही कार्यासाठी अगदी मनापासून झटतो. सर्वाशी प्रेमाने बोलतो. तो चतुर असतो,बलवान शांत,सौम्य मनाचा असतो. श्रीमंत असुनही ऊदार असतो. महाज्ञानी, असुन तो ऊत्तम वक्ता असुन निरलोभी असतो. सर्वाशी आदराने वागतो. आपले श्रेष्ठत्व व लिनता या गुणामुळे तो सर्वांना प्रिय असतो. **(क्रमश:)**

## निर्हेतुक कर्मात भगवंत



श्री ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराज

ज्योतिर्मय साहित्य

खरोखर, आज आपल्याला आपले अंतरंग ओळखण्याची खरी गरज आहे. सत्कर्म असो किंवा दुष्कर्म असो, हेतूवर सर्व काही अवलंबून असते. पुष्कळ पुण्यकर्मे केली, आणि काही तरी विषयाचा हेतू मनात धरला, तर काय उपयोग ! काबाडकष्ट खूप केले, बायकोपोरे टाकून बाह्यांगाने कितीही केले, तरी मन जोपर्यंत तिथे नाही तोपर्यंत राम नाही भेटणार. मनाला भगवंताची तळमळ लागली तरच त्याचा उपयोग. निर्हेतुक कर्मात भगवंत असतो, म्हणून आपली कर्मे तशी करावीत. खरे पाहता प्रापंचिकाएवढे काबाडकष्ट साधकाला, पारमार्थिकाला नसतात. प्रपंचाच्या काबाडकष्टांपेक्षा निम्म्याने जरी भगवंताकरिता केले तरी खूप फायदा पदरात पडेल. ज्या स्थितीत भगवंताने आपल्याला ठेवले त्या परिस्थितीतून त्याला ओळखणे सहज शक्य आहे. पण आपण विषयाकडे दृष्टी ठेवून कर्मे करतो, आणि भगवंत भेटत नाही म्हणून दु:खी होतो, याला काय करावे ? दैत्यदानवांनी भगवंताची तपश्चर्या केली, आणि समर्थांनीही केली; दानवांनी हेतू धरून केली त्यामुळे त्यांना हेतूचा, विषयाचा लाभ झाला, परंतु भगवंत अंतरला; याउलट, समर्थांना भगवंताशिवाय दुसरा कशाचाही लाभ नको होता. त्या लाभातच त्यांनी सर्वस्व मानले. उत्कट प्रेमामुळे भगवंताचा ध्यास लागतो. भगवंताला पाहून 'तू भेटलास, आता मला काही नको', अशी वृत्ती झाली पाहिजे, तरच मीपणा मरेल. भगवंताचा हात तर पुढे आहेच; आपलाच हात त्याच्यापर्यंत पोहोचत नाही.

बुद्धीपेक्षा आणि पैशापेक्षा सदाचरणाचे वजन जास्त असते. सदाचरण असून भगवंताची निष्ठा असेल, आणि आहे त्या परिस्थितीत समाधान ठेवण्याची सवय असेल, तर प्रापंचिक सुख लाभते. सुख हे कुठून उत्पन्न करायचे नसून ते आपल्या वृत्तीमध्येच असते. 'मी' भगवंताचा आहे, तसेच 'सर्वजण' भगवंताचे आहेत. म्हणून भगवंतावर प्रेम केले की सर्व जगावर प्रेम बसेल. ज्याप्रमाणे भगवंताच्या प्रसादामध्ये एखादा कडू बदाम आला तरी तो आपण खातो, त्याप्रमाणे भगवंताने एखादे वेळी दु:ख दिले तर ते आनंदाने सोसायला पाहिजे. चिकित्सा थोडी बाजूला ठेवून भगवंताचे आपण स्मरण करावे. अंत:करणाची शुद्धी नामाशिवाय नाही होणार. नामापरते काही नाही हे एकदाच ज्याच्या मनाने घेतले त्याला दुसरे काही सांगावे नाही लागत. मीठ म्हणून जरी साखर खाल्ली तरी साखरेची गोडी आल्याशिवाय राहात नाही; त्याप्रमाणे कोणत्याही परिस्थितीत जरी नाम घेतले तरी ते आपल्याला तारकच ठरेल यात शंका नाही.

ज्याच्यामागे उपासनेचा जोर आहे तोच जगात खरे काम करतो.




## आनंदाची अक्षरलेणी-''पुस्तके''

ज्योतिर्मय साहित्य

नमस्कार सर्वांना

पुस्तके म्हणजे माझ्या येणारे माझे आवडते पाहुणे आहेत.

स्वतः साहित्यिकांनी भेट म्हणून पाठवलेली पुस्तके, साहिरिकांनी समक्ष भेटीत आवर्जून दिलेली पुस्तके, साहित्यस्पर्धेचा परीक्षक म्हणून काम करतांना आलेली पुस्तके, साहित्यिकांच्या मित्रांनी पाठवलेली पुस्तके, अशा अनेक मार्गाने हे पुस्तक-पाहुणे माझ्याकडे सतत येत असतात.

पुस्तकांची व माझी भेट अशी एकतर्फी मुळीच नाहीये, मी नियमितपणे वाचनालयात जाऊन पुस्तकांना माझ्या घरी घेऊन येत असतो. वाचनाच्या निमित्ताने आणलेल्या या पुस्तक-मित्रांच्या सहवासात वेळ अगदी सार्थकी लागतो.

पुस्तकांची माझी मैत्री अगदी लहानपणापासूनची आहे.

आणखी एक सांगायचे म्हणजे ''वाचन करणे '' ही आमची पारिवारिक सवय आहे, आवड आहे .

पुस्तकांच्या सहवासात रमणे'' हा आम्ही भावंडांनी जपलेला छंद आहे असे म्हणेन.

वाचलेल्या पुस्तकांवर अभिप्राय लेखन करणे '', त्याचे पुस्तक-परिचय लेखन'' करणे हे कार्य गेल्या तीस वर्षांपासून माझ्या साहित्य लेखनातील मोठा महत्वाचा भाग झालेला आहे.

प्रिंट मीडियात बहुतेक सर्व नामवंत नियतकालिकांतून माझे पुस्तक-समीक्षा लेखन प्रसिद्ध झाले आहे, आणि २०११ पासून इंटरनेटवर सक्रिय झाल्यापासून ई-साहित्य प्लॅटफॉर्मवर मी विपुल असे पुस्तक-समीक्षा लेखन करीत आहे.

मित्र हो या लेखनातून मी आनंद मिळवतो. ज्या साहित्यिकांच्या पुस्तकावर लिहिलेले माझे लेख प्रसिद्ध होतात, त्यादिवशी हा साहित्यिक मित्र त्याच्या विश्वात ''हिरो ''असतो. त्याच्या मीडियात, मित्र मंडळीत त्याचीच चर्चा होते. त्याच्या आनंदात मला आनंद मिळतो.

माझे हे लेखन वाचकांना आवडते ''याची पावती प्रतिक्रियेतून मिळते, त्याने मी आनंदित होतो.

एक गोष्ट नक्की मित्रांनो - वाचनाची आवड असणे महत्वाचे. व्यक्तिपरत्वे पुस्तक वाचन स्वरूप बदलते.

कथा, कादंबरी, लेख,कविता, ज्याला जे आवडेल ते वाचून तो आनंद मिळवत असतो.

पुस्तकांच्या गुहेत ही अक्षरलेणी म्हणजे विविध पुस्तके असतात, यात मनोसक्तपणे फिरावे, पहावे, ही शब्दलेणी आपल्याला आत्मभान देणारी असतात.

दुरून डोंगर साजरे '' असे न म्हणता पुस्तक हाती धरावे, मनापासून वाचावे..आणि आनंद अनुभवावा.

आजच्या पिढीला वाचनाची आवड नाही, हल्ली वाचन कमी झाले आहे '', यापुढे पेपर, पुस्तकं वाचली जातील की नाही, ''या कल्पनेने चिंताग्रस्त झालेले अनेकजण हे मत व्यक्त करतांना आपण ऐकत असतो, पहात असतो, यांचे विचार वाचत असतो.

एक वाचक म्हणून मी सांगू इच्छितो की, वाचनालयात जातो तेंव्हा स्वतःच्या आवडीने पुस्तके घेऊन जाणारे वाचक मला नेहमी भेटतात, दिसतात.

माझे असे निरीक्षण आहे की -इंटरनेटच्या माध्यमातून नवी पिढी भरपूर वाचन करीत आहे,ही समाधानाची गोष्ट आहे.



## नीतिशतक निरूपण

अनुवाद आणि निरूपण
ह.भ.प.चंद्रहास शास्त्री सोनपेठकर

ज्योतिर्मय साहित्य

**जातिर्यातु रसातलं गुणगणैस्तत्राप्यधो गम्यतां**
**शीलं शैलतटात्पतत्वभिजन: सन्दह्यतां वह्निना ।**
**शौर्ये वैरिणि वज्रमाशु निपतत्वर्थोऽस्तु न: केवलं**
**येनैकेन विना गुणास्तृणलवप्राया: समस्ता इमे ।।**

अर्थ – कुळ रसातळाला जावो, गुणांचा समूह अधोगतीस प्राप्त होवो, शील पर्वतावरून खाली पडो, संमानित कुळ अग्नीत जळो अथवा शौर्यावर वज्रप्रहार होवो, परन्तु ज्या एकाच्या शिवाय सर्व गुणसमूह तृणवत् होतो, ते वित्त नष्ट होऊ नये.

या श्लोकात कवीश्रेष्ठ भर्तृहरींनी जीवनातील अर्थाचे म्हणजे द्रव्याचे अर्थात धनाचे महत्व् प्रतिपादन केले आहे. कुळ, शील, शौर्य अशा अनेक गुणसमूहांपेक्षा धन श्रेष्ठ आहे. कारण धन नसेल, तर हे गुणसमूह प्रभावी ठरत नाहीत, असा आशय या श्लोकात व्यक्त करण्यात आला आहे.



## आरोग्य संजीवनी

## एकदा पदार्थ तळलेले तेल पुन्हा वापरावे का?

ज्योतिर्मय साहित्य

पदार्थ तळून झाले की एक प्रश्न कायमच असतो की उरलेल्या तेलाचं काय करायचं? कुणी म्हणतं ते तेल भाजीआमटीला वापरुन टाकावे.


कुणी त्यातच पुन्हा पुन्हा पदार्थ तळते. कुणी ते तेल न खाता सरळ फेकून देते. यातलं खरंखोटं काय? तळलेल्या तेलाचं नेमकं करायचं काय?

आणि मुळात म्हणजे एकदा पदार्थ तळलेले तेल पुन्हा पुन्हा वापरावे का?

तर त्या प्रश्नाचं एकच उत्तर की एकदा आपण ज्यात पदार्थ तळला, ते तेल उरलं तर ते तेल अजिबात वापरू नये. असे पुन्हा पुन्हा गरम केलेले तेल आरोग्यासाठी अतिशय घातक असू शकते.

तळलेले तेल पुन्हा पुन्हा का वापरू नये?

१. तळलेले तेल पुन्हा पुन्हा वापरणे आरोग्यासाठी अतिशय हानीकारक असू शकते. त्या तेलाच्या पुर्नवापराने कॅन्सरसह अनेक घातक आजार होण्याची शक्यता असते.



२. पुन्हा पुन्हा तळलेले तेल वापरल्याने खराब कॉलेस्टेरॉल वाढते.

३. पुन्हा पुन्हा गरम केलेल्या तेलाच कॅन्सर कॉजिंग एजंट, पॉलिसायकलिक ॲरोमॅटिक हायड्रोकार्बन म्हणतात ते हानीकारक घटक असतात. त्यानं कर्करोग होण्याचा धोका बळावतो.

४. अनेकदा गरम केल्यानं तेलात विषारी प्रक्रिया सुरु होते.

५. त्यातले चांगले घटक कमी होतात.

६. म्हणून पुन्हा पुन्हा तळलेले तेल आरोग्याला अतिशय हानीकारक असते ते वापरू नये.

संकलन –
डॉ. प्रमोद ढेरे (निसर्ग उपचार तज्ञ)
पिंपरी-चिंचवड, पुणे.
आरोग्यविषयक व्याख्याते व लेखक
संपर्क – ९२ ७१ ६६९ ६६९

## आचरणात आणावे असे



ज्योतिर्मय साहित्य


त्या व्यक्तीने पुढे म्हटले, ''जर असा एखादा दिवस आला की, तू दरवाजा वाजवलास व मी उघडला नाही, तर तू पोलिसाना कळव.


त्या मुलाला धक्का बसला व त्याने विचारले, का ? ते गृहस्थ म्हणाले, माझी बायको हल्लीच वारली, मुलगा परदेशी असतो व म्हणून मी एकटाच आहे. कुणास ठाऊक माझा नंबर कधी येईल ते ! मुलाला त्या गृहस्थांच बोलण हे जड मनाने व डोळ्यात अश्रू आणून केल्याच दिसल. त्या गृहस्थाने पुढे सांगितले, मी कधीच पेपर वाचत नाही फक्त दरवाज्यावरील टकटक ऐकण्यासाठी किंवा बेलचा आवाज ऐकण्यासाठी, तसेच ओळखीच्या माणसाला पाहणे व त्याच्याशी दोन शब्द बोलण्यासाठी पेपर सुरू केला आहे. पुढे त्या गृहस्थाने त्या मुलाचे हात हातात घेऊन व त्याला आपल्या मुलाचे कार्ड देऊन सांगितले, जर एखाद्या दिवशी मी दरवाजा उघडू शकलो नाही तर, पोलिसांना सांग व माझ्या मुलालाही कळव.

म्हणजे जगात अशी एकटे राहणार्या बर्याच वृद्ध व्यक्ती आपल्या आजूबाजूला असतील. तुम्हाला वाटेल की, अशा व्यक्ती तुम्हाला रोज सकाळ-संध्याकाळ व्हाट्सॲपवर का संदेश पाठवीत असतील? खर तर हे दरवाजावर टकटक करण किंवा दरवाजावरील बेल वाजवण्यासारखेच आहे. आपण अजून सुखरूप असण्याचा संदेश देणेच आहे.



## रवींद्रनाथ टागोर





विश्वास देशपांडे,
चाळीसगाव
मो. ९४०३७४९९३२

### रवींद्रनाथ टागोर : वारसा आणि कार्य

ज्योतिर्मय साहित्य

टागोरांच्या कवितेत बहुतेक सर्व विषय आलेले आपल्याला दिसतात. त्यात देशप्रेम आहे, परमेश्वराची भक्ती आहे, निसर्गाच्या सौंदर्याचे वर्णन आहे, निर्व्याज उदात्त अशी प्रेमभावना आहे. पण त्यांच्या बहुतेक कवितांमध्ये आपल्याला निसर्ग प्रतिबिंबित झालेला दिसतो. निसर्गातील सौंदर्यामागे असणारे ईश्वराचे अदृश्य हातही त्यांना वेळोवेळी जाणवतात. त्यात त्यांना ईश्वराचा साक्षात्कार झालेला आहे.

एका प्रसंगी त्यांनी पाहिले की शारदातले ढग निळ्या आभाळात विहार करताना खाली असलेल्या भाताच्या पिकावर छाया धरीत तरंगत होते. ह्या अद्भुत दृश्याचा त्यांच्या मनाने ताबा घेतला. त्यांना हे सुंदर दृश्य निर्माण करणाऱ्या कारागिरांच्या हातांची आठवण झाली. आपल्या कवितेत ते म्हणतात

खेळ चालिला आज लपंडावाचा
छाया आणि प्रकाशाचा
भाताच्या शेतातून,
झपाट्याने जाताना,
निळ्या आकाशात
तरंगणाऱ्या पांढऱ्या ढगांचा ,
ताफा हाकणारा तो कोण आहे बरं ? ( शरदोत्सव )

त्या अदृश्य हातांचा शोध घेण्याची उत्कंठा त्यांच्या मनात सदैव जागृत होती. अशाच एका प्रसंगी वर्षाऋतूच्या आगमनाच्या वेळी आकाशात जमलेल्या ढगांच्या विविध रंगांमुळे रवींद्रनाथ थरारून जातात. त्या विविधरंगी आकाशाची तुलना ते मोराच्या पिसाऱ्याशी करतात. पावसाळी ढगांच्या सौंदर्याने ते मोहित झालेले आहेत. एखाद्या लहान मुलाप्रमाणे ते आनंदी झाले आहेत. त्यातच परमेश्वराला शोधण्याची त्यांची उत्कंठा पुढील ओळीत स्पष्ट दिसते.

मयुरापरी नाचे आज मन माझे रे
शत शत रंगात उसळती मम भावना
फुललेल्या मयूर पंखापरी
मोहोरलेली मम दृष्टी आकाशी लावूनी
त्या उल्हासी कर्त्यासी मी शोधितो रे, शोधितो रे ।

पुढे त्यांनी कथा, कादंबरी, नाटक असे अनेक साहित्यप्रकार हाताळले. पण त्यातही त्यांची कविता आणि कविमन प्रामुख्याने दृग्गोचर होते. त्यांच्या कवितेत रसिकांना भरभरून देण्याचे सामर्थ्य आहे. आपलीच ओंजळ घेण्यासाठी अपूर्ण पडते. आपल्या प्रत्येक रचनेत ते काहीतरी मौल्यवान संदेश देऊन जातात. त्यांची झोळीची गोष्ट सांगणारी एक कविता आहे. त्या कवितेत एक भिकारी भिक्षा मागत सर्वत्र हिंडत असतो. एकदा सकाळी तो असाच भिक्षा मागत हिंडत असताना आकाशातून एक सुवर्णरथ त्याला त्याच्या दिशेने येताना दिसतो. रथ त्याच्याजवळ येऊन थांबतो. आता आपल्याला काहीतरी मौल्यवान भिक्षा मिळणार अशा अपेक्षेत तो असताना, रथातील राजा खाली उतरतो आणि चक्क त्याच्यापुढे हात पसरून , ओम भवती भिक्षांदेही म्हणतो. भिकारी एकदम बावरून जातो. ही कसली क्रूर चेष्टा असे त्याला वाटते. तरी तो आपल्या झोळीत हात घालून चिमूटभर धान्य त्या राजराजेश्वराच्या ओंजळीत टाकतो. घरी येतो आणि पाहतो तर झोळीत काही सुवर्णकण चमकत असतात.

# संत तुकाराम महाराज म्हणतात...

## उचित जाणावे मुख्य धर्म आधी । चित्त शुद्ध बुद्धी ठायी स्थीर ।।

ज्योतिर्मय साहित्य

व्यवहारात, शिक्षणात किंवा अगदी परमार्थात देखील कुठलीही गोष्ट करायची असेल तर सर्वप्रथम ती गोष्ट अतिशय शुद्ध मनाने करावी. कोणत्याही प्रकारचा नकारात्मक विचार न करता स्वतःला त्या गोष्टीत गुंतवून घ्यावे.

माझ्या लोकमंगल प्राथमिक व माध्यमिक शाळा-पेंडसे नगर-आय टी आय जवळ, सातारा या शाळेतील २००९ साली दहावीमध्ये असणारी विद्यार्थिनी मोनाली तानाजी काळे हिने आपल्या स्वकर्तृत्वाने समाजामध्ये आदर्श निर्माण केला आहे. दहावीच्या परीक्षेपर्यंत मोनालीला एकटीने बाहेर जाण्याची कधी वेळच आली नाही. शाळेजवळच समर्थ कॉलनीमध्ये छोटेसे घर. वडील तानाजी काळे गवंडी काम करत. आई शांता काळे याना घरातील सर्व करावे लागे,त्यामुळे मोनाली सकाळी १० ते सायं. ५.३० वाजेपर्यंत शाळेतच असायची. शाळा हेच तिचे त्याकाळात दुसरे घर होते. घरापेक्षा ती शाळेतच जास्त असायची. पाहिलीपासून चौथीपर्यंत अनिल सुर्वे शिक्षक मोनालीला वर्ग शिक्षक होते. १९९९ साली पहिलीमध्ये शाळेत मोनालीने प्रवेश घेतला आणि सुर्वेसरांच्यामुळे तीचे गणित तसेच सर्वच विषय पक्के झाले. मोनालीचा दहावीच्या बोर्ड परीक्षेत ज्या शाळेत नंबर आला तो बघण्यासाठी कसे जावे हे समजेना. शाळेतील कोणाही विद्यार्थ्याचा त्या शाळेत नंबर नव्हता. नेमकी तिच्या घराशेजारी राहणारी मनाली काळे या दुसऱ्या शाळेत शिकणाऱ्या मुलीचा नंबर तिच्याच शाळेत आला होता. मोनाली म्हणते, मला वाटलं देवाच्याच मनात होत मी शिकावं. मोनालीला सोबत मिळाली.नुकतीच बहिणीची डिलीव्हरी झाली होती. घरची कामे करून तसेच बहिणीला मदत करून मोनाली ही मनालीच्या घरी जाई.मनालीचे घर सुखवस्तु कुटुंबाचे. तिची आई मनालीची वेणी घालून देणे, दप्तर भरून देणे,जेवणाचा डबा देणे हे तर करायचीच,तसेच रिक्षेमधून या दोघींना घेऊन परीक्षा सेंटरवर न्यायची. परीक्षा संपेपर्यंत सेंटरवरच थांबायची आणि दोघींना घेऊन परत यायची.मोनालीच्या आई-वडीलांनी अथवा मोठा भाऊ, संतोष काळे यांनी मात्र परीक्षेला ती कशी जात असेल याचा विचारच केला नाही. जातीय ना शेजारच्या मुलीबरोबर यातच समाधानी. मोनालीला वाईट वाटायचे.आपले आई-वडील परीक्षा केंद्रावर सोडायला येत नाहीत म्हणून.मुलींना जास्त शिकवायचे नाही हीच धारणा त्यांच्या कुटुंबात होती. आई-वडीलांनी शिक्षण नसतानाही मोठ्या दोन्ही मुलींना शाळेत शिकविले पण प्राथामिक शिक्षणच. जुन्या विचारांचे असल्यामुळे मुलींनी घराबाहेर पडायचे नाही असा शिरस्ता. मुलगी मोठी झाली म्हणजे लग्न करणे हेच त्यांच्या डोक्यात. त्यामुळे मोठी बहीण भाग्यश्री १६ वर्षाची असतानाच आणि तिच्यापेक्षा लहान जयश्री १६ वर्षाची असतानाच दोघींचीही लग्न करून देण्यात आली होती. मोनाली दहावी चांगल्या मार्कांने पास झाली. दहावी नंतर मोनालीला कॉलेजला जायचे होते परंतु कॉलेजला गेल्यावर मुली पळून जातात असे नातेवाईक बोलायचे म्हणून तिचे शिक्षण बंद करून लग्न करून द्यायचे आई-वडीलांच्या मनात होते. तसेच वडील



तानाजी काळे परिस्तिथी नसूनही आपल्या सर्वांचे दिवसभर गवंडी काम करून,कष्ट घेउन संसार बघतात याची तीला माहिती होती. मोनालीला मात्र शिकायचे होते.मोनाली ही विचार करणारी असल्याने तिने जवळच असलेल्या आय.टी.आय. मध्ये जाऊन स्वतःच सर्व माहिती घेउन ब्युटी पार्लरच्या कोर्स साठी वडिलांना न सांगता प्रवेश घेतला.तसेच अकरावीत कन्याशाळेत प्रवेश घेतला. दीड़ वर्षाचा ब्यूटीपार्लरचा कोर्स पूर्ण करीत अकरावी परीक्षाही चांगल्या मार्कांने पास झाली. बारामतीचा योगेश मोरे जो केस-कर्तनालयाचा व्यवसाय करायचा त्याच्याशी अकरावी झाल्यानंतर मोनालीचे लग्न लावून देण्यात आले. लग्नानंतर योगेशच्या प्रोत्साहनामुळे मोनाली योगेश मोरे बारावीचे शिक्षण पूर्ण करू शकली.लग्नानंतर घरकामात तीचा संपूर्ण वेळ जायचा. लग्नानंतर साधारण पाच वर्षांनी मोनालीचे वडील तानाजी काळे यांचा मोठा अपघात झाला. परंतु वडीलांना आपण हॉस्पिटलच्या खर्चासाठी काहीच मदत करू शकत नाही याबद्दल तीला फार वाईट वाटले. तीचा मोठा भाऊ संतोष इंजिनीअर झाला होता.तो मुलगा असल्याने आई-वडीलांनी त्याला कष्ट घेउन शिकविले असल्याने त्याचे उत्पन्नाचे स्त्रोत चांगले होते. त्यानेच वडिलांचा सर्व हॉस्पिटलचा खर्च केला. पण तो बोलता बोलता म्हणाला, बघा तुम्ही तिघी बहिणींनी वडिलांच्या हॉस्पिटलचा काहीच खर्च केला नाही. मी एकट्यानेच सर्व भार उचलला. मोनालीच्या मनाला आपण काहीच मदत न केल्याचे लागले. मोनाली एक मुलगी म्हणून वडिलांना एक रुपयाची मदत करू शकत नाही याबद्दल तीला लाज वाटली. नव-याकडेही पैसे मागू शकत नव्हती. मोठा भाऊ सहज बोलला, पण कुठतरी तिच्या मनाला लागलं आणि या खंत वाटण्यामुळेच आपण काहीतरी व्यवसाय करून उत्पन्न मिळविले पाहिजे ही उर्मी तिच्या मनात जागी झाली.

बारामतीला सासरी गेल्यावर नव-याकडून मोनालीने नवी एक खुर्ची आणि एक आरसा घेऊन जागा भाड्याने मिळवून ब्यूटी पार्लर चालू केले. सुरवातीला एक रुपयाचीही कमाई होत नसताना सातत्य ठेवून पार्लर चालू ठेवले. सहा महिन्यानंतर मोनालीच्या संभाषणचातुर्य व पार्लर सेवेतील वैविध्य यामुळे व्यवसाय वृध्दींगत होत गेला. हळूहळू पार्लरला लागणा-या सर्व वस्तू घेत सुसज्ज चांगले पार्लर मोनाली काळे-मोरे ने उभे केले. काही पार्लरचे अँडव्हान्स कोर्सेस पुण्यात जाऊन पूर्ण केले. यासाठी नवरा योगेश मोरे आणि त्याच्या घरच्यानी मुलांना सांभाळण्याचे काम करून मदत केली.योगेश मोरे यांच्या आई-वडीलांचीही साथ मिळाली. व्यवसायाला जागा अपुरी पडू लागली. दोघांनीही मिळून आता एकाच ठिकाणी युनीसेक्स पार्लर चालू केले आहे. मोनाली आणि तीचा नवरा योगेश आता एकाच ठिकाणी काम करतात. पाच-सहा मुली आता मोनालीला पार्लरसाठी मदत करतात. ब-याच मुलींना पार्लरचे शिक्षण मोनालीने पैसे घेऊन दिले. पण ज्या मुलींकडे पैसे नाहीत आणि अडचण आहे त्यांना मोफत शिकविले. आज मोनाली काळे-मोरे बारामतीत सामाजिक कामातही आघाडीवर आहे. आई-वडीलांना कायमच पैशाच्या स्वरूपात मदत करत असते. मोनालीच्या आई-वडीलाना तसेच घरातील सर्वांना तीचे कौतुक आणि अभिमान वाटतोय.



शिरीष चिटणीस

मोनालीचा मुलगा श्लोक योगेश मोरे यांस तिने आधी डोनेशन देऊन तसेच फी भरून पाठशाळा क्रमांक तीन वालचंदनगर या इंग्रजी माध्यमाच्या शाळेत घातले. पण त्तिथे त्याची प्रगती होत नाही हे बघून, कळंब येथील जिल्हा परिषदेच्या मराठी माध्यमाच्या शाळेत घातले. आता तो छान लिहितो, बोलतो आणि त्याची प्रगती झाली आहे. या शाळेत पहिलीपासून सेमी इंग्लिश आहे. फी नाही, डोनेशन नाही. मोनाली हे सर्व माझ्या शाळेत बालकुमार साहित्य संमेलनासाठी मागील महिन्यात आली तेव्हा सांगत होती. तीला एक मुलगीही आहे १० वर्षाची. तीचे नांव ईश्वरी. तीही चांगले शिक्षण घेत आहे. मोनाली जेव्हा आमच्या शाळेत पाहुणे म्हणून आली,तेव्हा आई-वडिलांना तसेच तिच्या बहिणीच्या मुलांनाही घेऊन आली होती. मोठ्या दोघी बहिणी भाग्यश्री आणि जयश्री त्यांच्या मुलांना मावशीचा आदर्श घ्या आणी मोठ्या व्हा असे सांगतात. मोनालीचा सत्कार केल्यानंतर तिने आम्हाला सांगून आई-वडीलांचाही सत्कार करून घेतला. आई-वडीलानी घेतलेल्या कष्टाची तीला जाणीव आहे.

भाषण करताना मोनाली म्हणाली...मी शाळेत चिटणीस सरांचे भाषण मनःपूर्वक ऐकायचे. सर ऐकत असणा-या मुलांचे कौतुक करायचे. पण मला वाटायचे मला पुढे बोलवावे आणि भाषण करावयास सांगावे. पण मला कधीच सांगितले नाही. ती संधी मला आज मिळतेय. मी जेव्हा हे ऐकले तेव्हा माझ्या लक्षात आले २००९ सालापेक्षा मी विद्यार्थ्यांकडे आता अधिक लक्ष देतोय आणि प्रत्येकाला भाषण करण्यास प्रेरणा देतोय.

कामाच्या शोधात सोलापूरहून साता-यात आलेल्या मोनालीच्या आई-वडीलांनी समर्थ मंदीर बोगदा परिसरात एका छोट्याश्या झोपडीत राहून प्रगती केली. इथेच मोनालीचा जन्म झाला. वडिलांनी थोडेसे पैसे साठवून आमच्या शाळेच्या जवळच समर्थ कॉलनीमध्ये एक गुंठा जागा घेऊन हातात पैसे येतील तसे छोटेसे घर बांधले. आणि सर्व मुलांचे कल्याण केले. मोनालीचे वडील तानाजी काळे तिचे तोंडभरून कौतुक करतानाच मुलींना शिकविलेच पाहिजे हे सांगत असतात. त्यांना आपल्या मुलीबद्दल प्रचंड अभिमान आहे. कब्बडी, खो-खो, अभ्यास, यामध्ये प्राविण्य मिळविलेली मोनाली ही शाळेत, समाजात जे जे चांगले आहे ते ते वेचत स्वकर्तुत्वावर मोठी झाली. तिचे भाषण शाळेतील सर्व मुले अगदी शांततेत ऐकत होती. तीच्या भाषणानंतर पडलेल्या टाळ्या तसेच कार्यक्रम संपल्यानंतर तिच्याबरोबर फोटो काढण्यासाठी चाललेली मुलांची चढाओढ अजूनही माझ्या डोळ्यासमोर तरंगते आहे. मोनालीच्या शाळेत येण्याने आणि कर्तुत्वाने मला मिळालेला आनंद अवर्णनीय. तीचा कष्टमय आदर्श जीवन प्रवास नक्कीच प्रेरणादायी आहे.

# दुर्मिळ निस्सीम प्रेमाची आर्त साद - प्रियतमा काव्यसंग्रह

ज्योतिर्मय साहित्य

प्रियतमा प्रत्येकाच्या मनात असतेच त्या प्रियतमेस समर्पित ....

प्रियतमा हा काव्य संग्रह म्हणजे आत्म्याचा आवाज होय.

प्रियतमा ही ऐहिक प्रेमाची कहाणी नसून अलौकिक प्रेमाचा साक्षात्कार आहे. या कवितेचा जन्म शुद्ध आणि उत्कट प्रेमातून झालेला आहे. जग हे प्रेमाने बांधलेले आहे. कवीसाठी प्रेम म्हणजे गोड वेदना आणि गोड मृत्यू आहे.प्रेम हा आध्यात्मिक आनंद होय.


जेव्हा प्रेयसी प्रियकराला सोडून निघून गेल्यावर प्रियकराची अगतिकता, उदासीनता, विरह यातून तो खोल सागरा मध्ये बुडण्याची जाणीव होते. उद्विग्न मनाची अवस्था यात व्यक्त होते . प्रेमात पडलेला मनुष्य हा स्वतःच स्वतःच शत्रू बनतो. दुःखाला नदीची उपमा दिलेली आहे त्यातही प्रियतमेची धूसर प्रतिमा दिसत आहे. नशिबाच्या रेषेवर काळया सावलीप्रमाणे . प्रियतमेचे गोड, कोमल,मधुर शब्द ऐकून मी प्रत्येक क्षणी जगतो आणि मरतो आहे. अपूजनीय, अभिशप्त योगिनीच्या अद्भुत इच्छेने. बारा महिने रंग बदलणारी चिमणीसारखी आपोआप बदलेल. एखादी निर्गम अदृश्य संधी पाहून आपली हाताची भाग्य रेखा कापून टाकेल परत जाण्याचा कोणताही मार्ग पायवाट उरणार नाही.

आलिंगनाची इच्छा व्यक्त केलेली आहे. अनेक दिवसांचा शतकांचा राग ,अभिमान विसरून नवीन गोष्ट सांगशील का? असे केल्यास गाठलेली सर्व दुःख न पडणाऱ्या पावसाच्या पाण्यात वाहून जातील.

प्रियतमा जेव्हा आयुष्यात नसेल तेव्हा आयुष्यात अष्ट दिशा ,चौदा भुवने रिकामे वाटतात. इतका अधःपात, प्रेयसीच्या अभावाच्या नरकात कवी मरतो हा आवाज कवीच्या हृदयाच्या तळघरातून येतो आहे. प्रेम हे झाडावरील निषिद्ध फळ आहे. बदनामी नंतरची एक रात्र ही सात रात्री प्रमाणे दीर्घ आणि असूरी होते.

मोहिनीच्या रूपात शृंगार करून भेटायला येशील का ? असा प्रश्न कवी प्रियतमेला विचारत आहे.खऱ्या प्रीतीला ग्रहण असतेच ते म्हणजे भीती आणि दहशतीच . अंतर्मनातील कल्लोळ हा अनेक भावना कवी या कवितेत मांडतो आहे. घनघोर पावसाचा क्षण कवीला प्रियतमेसोबत घालवण्याची इच्छा विचार आहे.

कवी जेव्हा एकटा असतो तेव्हा तो प्रियतमेच्या विरहात मरतो.भयंकर कोलाहलात बुडणारी आठवण अबोल हसू श्वास,गुप्त संवाद , प्रियतमेचे निरलस आणि निष्पाप निर्मळ प्रेम ही फार सुंदर जादूई अनुभूती आहे. प्रेमात पडल्यावर आनंदी राहणं, आठवणीत हरवून जाणे, प्रियतमेच्या वाटेकडे वाट पाहत बसणं हा आवडता छंद व्यक्ती प्रेमात पडल्यास लागतो. नशिबाची पत्रे स्वतः वाचत अज्ञात भीती दहशतीत कोरड्या ,शुष्क झाडाप्रमाणे मनुष्य तुटून जातो. प्रत्येक क्षणी प्रियकर प्रियतमेची वाट पहातोच. तू येशील अशी शपथ घेणारी प्रियतमा बहुतेक कधीच आली नाही. अनेक वर्ष उलटून गेली आणि प्रियकर आणखीन वाटेकडे पाहत आहे. आशेने किती वर्ष गेली हे तरी प्रियतमेला माहीत आहे का ? असा प्रश्न विचारून कदाचित हे वाट पाहण हे एकतर्फी असू शकते अशी शक्यता यात अंतर्भूत असू शकते. प्रियतमेच्या दयेची, करुणेची निर्जीव ग्राहकासारखा वाट पाहणारा प्रियकर हृदय पिळवटून टाकणारे प्रेमी हृदय आत मध्ये आक्रोश करते. तो संन्यासही घेऊ शकत नाही, दुसऱ्या स्त्री च्या प्रेमात पडू शकत नाही. मनुष्य जेव्हा माणूस होतो तेव्हा तो कवी बनतो. आपुलकीने, आदराने, सहानुभूतीने पहिल्या दृष्टिक्षेपात दत्तक घेतलेल्याना आपलेसे करणे. एक स्त्री क्रूरता आणि निर्दयतेने मारू शकेल का?





कवी म्हणून जन्म घेणे कवी म्हणून जगणे मरणे आयुष्यभर सुंदर मुलीच्या प्रेमात पडणे तेही फक्त एका व्यक्तीच्या प्रेमात पडणे ही नशिबाची बाब आहे. प्रियकर प्रियतमेच्या केसांना फुलांनी सजवणार आहे , तिला तो फुलांच्या माळा देणारं आहे. तो तिच्या पायात चांदीचे पैंजण बांधणार आहे. मैत्रीपूर्ण मन जेव्हा व्यथित होते शरीराच्या संपर्काशिवाय मनाला निरर्थक शब्द वाटू लागतो. तुझी वाट मी पुढच्या जन्मात ही पाहूनच असे आश्वासन प्रियकर या जन्मात न येणाऱ्या प्रियतमेला देत आहे. प्रियकर प्रीतीत किती जिद्दी बनला आहे याचे सुरेख वर्णन या रचनेत आहे. प्रिये तुला कोणत्या नावाने हाक मारू ? असा प्रश्न प्रियतमेला विचारल्यावर प्रियकर म्हणतो की चौसष्ठ जन्म घेतले तरी माझ्या मनामध्ये, नसा मध्ये तुझेच नाव गुंजणार आहे.तुझ्या देहाची निर्जीव रिकामी मूर्ती जे काही करून जगामध्ये आपले अस्तित्व मळकट, निरर्थक आणि वर्णहीन वाटते. जेव्हा प्रियतमा वात्सल्य रुपी आईसारखी येते, कधी स्फंदनाऱ्या पत्नीसारखी येते तेव्हा प्रियकर देवी देवता सूर्य चंद्र ग्रह तारे सर्व विसरतो.इतका तो प्रियतमेच्या प्रीतीत हरवून जातो.

माझे अपंगत्व, कमजोरी प्रेमात द्वेषात असले तरी मी उर्वरित आयुष्य तुझ्याशी बांधीलाच राहणार आहे.तुझे जग दिवसेंदिवस इतके विस्मयकारक वाटतंय. प्रिये तुझ्याशिवाय निःशब्द, निरर्थक जीवन शब्दांच्या गोष्टी ह्या हवेत उडणाऱ्या शब्दांच्या बाणासारख्या असतात. या शरीरातील मन घेऊन जाणारा परत कधी येत नाही. माझ्या जर्जर झालेल्या शरीराला तुझ्या स्वप्नात रात्र घालवू दे. तू एक अप्राप्य फुलं ये अशी जवळ बस कारण तू आहेस मंद जळणारी, न विझणारी प्रेमाची वात.कवी प्रियतमेस चिमणीची देखील उपमा देत आहे. कवीची धरती किती एकाकी झाली आहे कारण तू आकाशात चिमणी होऊन एकटीच भटकत आहेस. तुझ्याशिवाय निराधार . तुझ्या केसांचा अंबाडा सोड तुझ्या केसातील मोती अविरतपणे पडू दे. मन आणि वय दोन्हीही उत्तेजीत प्रिये तुझ्या केसात एक फुल मळू दे.आमच्या आठवणीच्या नदीत दुःखाचे ध्येयहीन जहाज तरंगत आहे.प्रियतमेची आठवण ही ढगासारखी तरंगत येते. मी मनातल्या मनात हसतो मध्येच अचानक रडतो. दुःखाची अनामिक भीती वाटते.मी अजूनही तुझी येण्याची यमुनेच्या तीरावर वाट पाहत बसतो.

माझ्या प्रिये , माझ्यासोबत सदैव रहा. स्वर्ग ,नरक आणि पातळलोकपर्यंत कशी अतीव ओढ आहे सोबत राहण्याची. असे प्रेम मिळायला पण नशीब लागते. ते प्रत्येकाच्या नशीबी असेल असे नाही.

खुले आहे घर, उघडा पडला आहे संसार
या देहासाठी किती भीती किती दहशत
रात्रंदिवस तुझी आठवण येत आहे.
खंगत चालले आहे शरीर
रक्ताने बांधतात मध्ये भिंत आपलेच भाऊ
आणि मी तुझ्या प्रेमात बेहोश.
तू नेमकी आहेस तरी कोठे ? एखाद्या काल्पनिक
माणसाच्या मिठीत की भग्न मंदिरात की माझ्या
हिरव्यागार जंगलात की स्वप्नात नंदनवनात?
तू कोण मी कोण आपण याक्षणी आहोत कुठे ?

संपूर्ण प्रदेश शोकाकुल होईल,प्रिये प्रेम हे निषिद्ध वृक्षाचे फळ आहे का? प्रेमाच्या कादंबवनात मी निळे विष प्राशन करणाऱ्या शिवासारखा वाट पाहत आहे. येण्याची वेळ उलटून गेल्यावर मला मृत्यूचा शंखनाद विव्हळकरतो आहे.प्रेम शरद ऋतूतील आकाशासारखे शांत आणि निर्मळ मोत्यासारखी.



पुस्तक परीक्षण

सौ. जयश्री अर्जुन मुंडे
अंबाजोगाई

कवीच्या रोमारोमात प्रियतमा आहे. हृदयात आहे मनात आहे आत्म्यात आहे.आपलं प्रेम हाच आहे आदि आणि अंत.तुझ्या विरह वेदनेचा तीक्ष्ण काटा डोक्यापासून पायापर्यंत सतत रेंगाळत आहे. कोणत्या प्रेमाने तुला वेडे केले आहे. माझे पाय आणि घोटे फुटले आहेत. एक वाळलेले झाड धाराषयी पडले आहे.माझे विषारी निळे अंग होऊ दे शांत शांत.नियंत्रण नसेल तर चुका होऊ शकतात. आपल्या प्रेमाच्या जगाचे मानचित्र खराब होईल का?

आजपासून विषय संपला तू जा तुझ्या रस्त्याने मी माझ्या रस्त्याने एकटाच जात आहे. एकाकी दिव्यांसारखा असून नसल्यासारखा तुझ्या आवाजाच्या भासात मी विचलित झालो आहे.

पळसबनात माझी चिंता सजवा हात कापून त्या रक्ताने लिही एकमेकांना समजून न घेण्याचा कलंकित इतिहास कधीकाळी आपण जिवलग असण्याचा.आता विषय संपला आहे . तू तुझ्या रस्त्याने मी माझ्या रस्त्याने एकटा .. कोणत्या चुकीसाठी माझे प्रेत तू सजवता आहेस. जखमी हातानी माझ्यातल्या प्रेत पुरुषाला. सारी पिडा दाबून तू विधवेसारखी लज्जा लपवत आहेस नवरा आणि मुलांसमोर. प्रत्येकजण विचारात आहे की जिच्यासाठी प्रेमगीत लिहिले ती प्रेयसी कोण आहे.अश्रू आणि रक्ताने न्हालेली तुझी प्रियतमा दैवी की राक्षसी?

ताडफडणारे हे शरीर तुझ्या प्रत्येक क्षणी मत्सर , द्वेष , संशय , दांभिक फसव्या जगातून धारदार तीर . प्रियतमा आपले नाते इतके किरकोळ आहे का? साध्या धक्क्याने फुटणारे स्फटिक आहे का? माझ्या कुजलेल्या शरीरात वेदना वाढत आहेत. माझ्यावर अविश्वास कारण थांबव. कलंक लावून माझ्या पवित्र प्रेमाला विसरू नकोस.तुझ्या हृदयातील गार्ड काळ्याभोर उदास आकाशात न डरता न घाबरता मी उडत राहीन.तू अनासक्त देवीच्या प्रतिमेसारखी निरालिप्त आणि उदास. एका स्वप्नाळू कवीच्या काल्पनिक धरतीवर अनेक गोष्टी विसरत आहेत. काही वर्षापूर्वी ऐकलेला तुझा आवाज शांत स्निग्ध पुन्हा ऐकण्याची तीव्र इच्छा होती.तू कुठूनही गेलीस तरी तुझ्या पैंजणाचा आवाज माझ्या कानात घुमत राहणार आहे.

अनुवाद अस्सल प्रेम भाव किंचितही बदल न करता नवीन निर्मिती करणे. मल पृष्ठ हे डॉ.फॅनी महाती आणि डॉ. संजय बोरुडे यांचे छायाचित्र या पृष्ठावर आहेत. भावपूर्ण अनुसृजन विरहाची जी वेदना माणसाला घायाळ करते ती या काव्यसंग्रहातूनच.

पुस्तकाचे नाव. प्रियतमा
मूळ लेखक. डॉ. फनी महंती
अनुसृजन. डॉ.संजय बोरुडे
पृष्ठ संख्या. ८३
किंमत.१८० रुपये
प्रकाशक. साहित्याक्षर प्रकाशन

# ''आला सण होळीचा .....''

होळी हा रंगाचा सण आहे अगदी लहान मुलांपासून तर वयस्करांपर्यंत सर्व जणांनी एकत्र येऊन आनंदाने साजरा करण्याचा हा सण आहे.रंगाची उधळण तर असतेच, पण मनातील राग होळीच्या दिवशी आरोळ्या मारुन,ग्रामीण भागात त्याला बोंबा मारून राग व्यक्त करणे म्हणतात. एखाद्याच्या नावाने शिमगा करण्याची प्रथाही या सणात आहे. त्या दिवशी अशा गोष्टींकडे दुर्लक्ष करून एक गमतीदार भाग म्हणून स्वीकारला जातो. तरीपण अशाप्रकारे आरोळ्या मारतांना त्या कृतीने आजूबाजूला तणाव निर्माण होईल अशी कृती मात्र व्हायला नको हे बंधन प्रत्येकाने पाळायला हवे. होळीच्या दिवशी आपण बऱ्याच वेळा वर्तमानपत्रात राजकीय सामाजिक कार्य करणाऱ्या लोकांची होली है बुरा न मानो असे म्हणून त्याच्या बोलण्याची किंवा एखाद्या सवयीची मस्करी केली जाते परंतु त्या दिवशी ते माफ असते शक्य तर कोणी मनावर घेतच नाही.

आपल्याकडे नवीन वर्षाची सुरुवात गुढीपाडव्याला होते, आणि शेवटचा सण तो होळी चा सण असतो. यावर्षी तेरा मार्चला होळी आणि चौदा मार्चला धुलीवंदन आहे.

पौर्णिमा तिथीची सुरुवात : १३ मार्च २०२५ रोजी सकाळी १० वाजून ३५ मिनिटांपासून आहे, व

पौर्णिमा तिथी समाप्ती : १४ मार्च २०२५ रोजी दुपारी १२ वाजून २३ मिनिटापर्यंत आहे. कालनिर्णय पंचांगाप्रमाणे १३ मार्च रोजी होळी असून १४ रोजी धुळी पौर्णिमा म्हणजे धुळवड आहे

यावर्षी होळी १४ मार्च रोजी साजरी केली जाईल.

१३ मार्च रोजी रात्री उशिरा होलिका दहन होईल. ज्योतिषांच्या मते, होलिका दहनाचा शुभ मुहूर्त रात्री ११:२६ पासून सुरू होईल आणि दुपारी १२:३० पर्यंत राहील. या वेळी होलिका दहन केले जाईल. हा मुहूर्त विशेष मानला जातो आणि या काळात होलिका दहनाची विशेष पूजा आणि विधी केले जातात. या शुभ मुहूर्तानंतर लोक होलिका दहनाचे आयोजन करतील.



दिलीप देशपांडे
मोबा..८९९९५६६९१७

फाल्गुन पौर्णिमेला आपण ''होळी'' सण साजरा करत असतो. त्यालाच हुताशनी पौर्णिमा असेही म्हणतात.होळीचा उत्सव,''होलिकोत्स्वव'' म्हणतात.

आपल्याकडे होळीला शिमगा असेही म्हणता तसेच होरी हा शब्द सुध्दा प्रचलित आहे.

वसंत ऋतूचे आगम झालेलेअसते. वातारणात,नैसर्गिक बदल झालाअसतो.थंडी संपून, उन तापायला सुरूवात झाली असते.उन्हाळ्याची चाहुल लागते.पानगळ सुरु झाली असते.पळसाचे फुले आली असतात. पूर्वीच्या काळी होळीच्या वेळी रंग ओढण्यासाठी पळसाच्या फुलाचा वापर केला जात असे फुलाचा रंग काढून तो लावला जात असे आयुर्वेदातही पळसाच्या फुलाचे महत्त्व आहे. आंघोळीच्या पाण्यात पळसाचे फुले टाकून आंघोळ केल्यास त्वचारोग नाहीसा होतो असे म्हटले आहे.


उत्तर भारत,दक्षिण भारत,महाराष्ट्रात होळीचा सण हा वेगवेगळ्या पद्धतीने साजरा होतो. महाराष्ट्रातील खानदेश विदर्भ कोकण या ठिकाणी सुद्धा वेगवेगळ्या पद्धतीने होळी साजरी करतात. कोकणात होळीचा सण जवळपास पंधरा दिवस साजरा केला जातो तर इतर ठिकाणी होळी पौर्णिमा धुलीवंदन म्हणजेच धुळवड नंतर रंगपंचमी शिमगा असा हा सण वेगळ्या पद्धतीने साजरा होतो.

आपल्याकडे आता होळी पौर्णिमेनंतर दुसऱ्या दिवशी धुलीवंदन म्हणजे धुळवड असते पण त्याच दिवशी युवा मंडळी धुळवड आणि रंगपंचमी साजरी करतात डीजे लावून होळीचे गाणे लावून नाचतात एकमेकाला रंग लावतात संपूर्ण रंगाने अंग भिजवून घेतात की चेहरे ओळखू येत नाही अशा प्रकारे आनंद व्यक्त करतात.

उत्तर भारतात पुतना राक्षिणीला जाळतात.

तर दक्षिणेस कामदेवाचे दहन करतात.

कोकणात होळीचा उत्सव मोठा असतो. विशेष रत्नागिरी जिल्ह्यात जास्त.तसेच मालवण. तिकडे शिमगो असेही म्हणतात. कोकणात हा सण पाच ते पंधरा दिवस असतो. होळीचा हा मुख्य दिवस असतो . ग्रामदेवतेच्या मुख्य मंदिरासमोर पहिला होम लावण्याचा मान असतो, व त्यातील निखारा घेऊन मग गावातील ठिकठिकाणी होळी पेटवली जाते. होळी पौर्णिमा, धुळवड, आणि रंगपंचमी



असा हा सण साजरा केला जातो. होळी हा रंगांचा सण समजला जातो. तसेच एकमेकांना रंग लावून रंगपंचमी साजरी केली जाते. तसेच पारंपारिक नृत्य पारंपारिक गाणे यामध्ये साजरे केले जातात वंजारी समाजात होळीला फार महत्त्व आहे. पारंपारिक पोषाख घालून नृत्य करण्याची प्रथा आहे.

म.प्र.त इंदोर, वरती मथूरा,वृंदावन, नंदगाव,ला होळी विशेष साजरी होते. मथुरा आणि वृंदावन येथील होळी व तिथला उत्साह अवर्णनीय असतो, मथुरा येथील फुलांची होळी ही जग प्रसिद्ध आहे. यासाठी गुलाब, कमळ, चंपा, चमेली, यासारखे फुलांची होळी साजरी केली जाते.

प्रत्येक ठिकाणच्या आख्यायिका वेगवेगळ्या सांगितल्या जातात.

महाराष्ट्रात भक्त प्रल्हादाची गोष्ट सांगितली जाते. हिरण्यकश्यपू हे भक्त प्रल्हादाचे वडिल.ते त्याचा फारच छळ करायचे.प्रल्हादाने विष्णुचे/नारायणाचे नाव घेऊ नाही म्हणून त्याला उंच कड्यावरुन लोटले, उकळत्या तेलाच्या कढईत टाकले, पण त्याला काहीही झाले नाही.म्हणून बहिण हुंडा/होलीका जिला अग्निचे भय नसते.तिला वर लाभला असतो, तिच्या मांडीवर अग्नित प्रल्हादाला बसविले जाते,पण प्रल्हादाला काहीच होत नाही.पण हुंडा जळून जाते.अशी कथा आहे.

अर्थातच वाईट गोष्टींचा नाश व्हावा, दुर्गुणाचा नाश व्हावा हीच त्यामागील भावना आहे.

पूर्वीच्या काळी गावातील प्रमुख चौकात नगारखान्यात होळी पेटवली जात होती.आताही गावातील प्रमुख चौका बरोबरीने, निरनिराळ्या काँलन्यातून होळी पेटवली जाते.एका खड्ड्यात एरंडाची उंच फांदी रोउन आजूबाजूला शेणाच्या गोवऱ्या रचतात. लाकूड, झाडाच्या वाळलेल्या फांद्या रचतात.हार घालतात.मुख्य होळी पेटवली की तिथून मशाल पेटवून इतर होळी पेटवितात.असा प्रघात आहे.

होळी पेटवलेल्यावर होळीच्या दर्शनासाठी गर्दी होते.स्त्रिया पूजा करतात. पुरण पोळीचा नैवेद्य दाखतात. पुरूषमंडळी नारळ अर्पण करतात.खोबऱ्याची वाटी होळीच्या निखाऱ्यावर भाजून तो प्रसाद वाटतात. सुख-समृद्धीसाठी प्रार्थना करतात. होळीला घरोघरी पुरणपोळी,कटाची आमटी,हे समीकरण ठरले असते.

एकमेकांशी वैर,राग असेल तो होळीत टाकून संबंध सुधारावेत ही भावना असते.

होळी सण साजरा करत असताना वृक्षतोड होणार नाही याची दक्षता घ्यावी वृक्षतोड केल्यास दंडात्मक करावे होऊ शकते याचे भान ठेवावे तसेच त्याच्या गल्लीतील लोक स्वच्छने देतील तेवढे गौऱ्या आणि लाकूड होळी जाण्यासाठी घ्यायला हवे उगीच त्यासाठी वादावादी करू नये. सगळ्यांनी एकत्र येऊन साजरा करण्याचा हा संघ असल्यामुळे अशा गोष्टी घडायला नको जेणेकरून बंधू भावाने व आनंदाने साजरा होईल.

होळीच्या दुसरे दिवशी धुलीवंदन-धुळवड साजरा करतात. तर पाचव्या दिवशी ''रंगपंचमी '' साजरी करतात.सर्वत्र भेदभाव-भांडणे-वैर-विसरुन रंगाची उधळण करतात. पावरा लोकात हा सण मोठ्या प्रमाणात साजरा होतो.बंजारी समाजातही होळी उत्साहाने साजरी होते.

रंगांची उधळण करत असताना तो रंग अपायकारक नसावा, तसेच कोणालाही इच्छा विरूद्ध रंगवू नये. पाणी भरलेल्या फुग्यांचा वापर करू नये शक्यतोवर गुलाल उधळून आनंद व्यक्त करावा पूर्वीच्या काळी पळसाच्या फुलांचा रंग काढून त्याचा वापर केला जायचा आणि त्यामुळे कुठली हानी होत नव्हती. मद्य प्राशन करू नये. या सर्व गोष्टीचे भान ठेवणे महत्त्वाचे आहे.मोठ्या प्रमाणावर भांगही घेत असतात.

होळीचाच भाग रंगपंचमी ला रंग उधळला जातो.राग मानायचा नसतो.म्हणूनच ''बुरा ना मानो होली है''!!

म्हणतात.

अनेक ठिकाणी रंग बरसे...भिगी चुनरिया..,रंग बरसे.. होली.. रे होली..रंगोकी होली...,अशा गाण्यावर धुंद होऊन नाच केला जातो.आनंदोत्सव साजरा करतात.

होलिका ही वाईट प्रवृत्तीची असल्यामुळे तिचा अंतही वाईट पद्धतीनेच झाला. त्यामुळेच वाईट आचार विचारांना बाजूला सारणे संपवणे, मनातील वाईट विचार होळी प्रमाणे अग्नीत जाळून राख करणे, हाच होळी साजरा करणे या मागचा उद्देश आहे. याच दिवशी वाईट विचारांचा व वाईट गोष्टींचा त्याग केला पाहिजे.आज आपण बघतोय एकमेकां विषयी वाईट भावना किती टोकाला पोहचल्या आहेत.एकमेकांच्या विषयी चांगल्या भावना नाही, पदोपदी दुष्मनी आढळते, ती नष्ट होणे आजच्या काळात प्रामुख्याने गरज आहे हे सांगायला नकोच.

आपल्या देशात पूर्वीच्या काळी आपल्या देशात सर्व सणवार बंधूभावानी आणि आनंदाने साजरी केली जात होते.आणि त्या सणांचा आनंद घेतला होता. परंतु आता परिस्थिती बदललेली आहे प्रत्येकाने वेगवेगळ्या प्रकारे आपल्या पद्धतीने सणवार साजरे करायचे ठरवले असे दिसते. राजकीय स्वरूप आले आहे. दहीहंडी गणेशोत्सव दुर्गा उत्सव यावेळी आपणाला असे वेगळेपण जाणवते.

किमान अशा सणवाराचे प्रसंगी तरी सगळे राग रुसवे बाजूला ठेवून एकत्र यायला हवे.आनंद घ्यायला हवा.

होली के दिन दिल खिल जाते है..
रंगो मे रंग मिल जाते है..
गीले शिकवे भूल के दोस्तों..
दुष्मन भी गले लग जाते है..

# परीक्षेच्या काळात शालेय मुलांची काळजी कशी घ्यावी?

**ज्योतिर्मय साहित्य**

परीक्षा हा विद्यार्थ्यांच्या आयुष्यातील एक महत्त्वाचा टप्पा असतो. या काळात शारीरिक तसेच मानसिक तणाव वाढतो. योग्य आहार, व्यायाम, पुरेशी झोप आणि सकारात्मक मानसिकता ठेवून विद्यार्थी परीक्षेच्या काळात आपले आरोग्य चांगले राखू शकतात.

**१. संतुलित आहाराचे महत्त्व**

परीक्षेच्या काळात विद्यार्थ्यांनी पौष्टिक आणि संतुलित आहार घेतला पाहिजे. ताजे फळे, भाज्या, दूध, डाळी, कडधान्ये आणि कोरडे फळे यांचा समावेश असावा. जास्त तळलेले पदार्थ, जंक फूड आणि कोल्ड ड्रिंक्स टाळावेत. पुरेशी पाणी पिण्याची सवय लावल्यास शरीर हायड्रेट राहते आणि थकवा जाणवत नाही.

**२. पुरेशी झोप आवश्यक**

झोपेचा अभाव मेंदूच्या कार्यक्षमतेवर परिणाम करतो. परीक्षेच्या काळात विद्यार्थ्यांनी किमान ७-८ तास झोप घेतली पाहिजे. रात्री उशिरापर्यंत अभ्यास करून सकाळी लवकर उठणे टाळावे. व्यवस्थित झोपेमुळे स्मरणशक्ती वाढते आणि लक्ष केंद्रित करणे सोपे होते.

**३. मानसिक ताण कमी करणे**

विद्यार्थ्यांनी परीक्षेचा तणाव घेऊ नये. योग, ध्यानधारणा, हलका संगीत ऐकणे किंवा छंद जोपासणे यामुळे मानसिक शांतता लाभते. पालकांनीही मुलांना समजून घेत त्यांना प्रोत्साहन द्यावे. दबावाऐवजी आत्मविश्वास वाढेल, अशी सकारात्मक भावना निर्माण करावी.

**४. नियमित व्यायाम आणि शारीरिक हालचाल**

शारीरिक आरोग्य उत्तम ठेवण्यासाठी विद्यार्थ्यांनी रोज थोडा वेळ व्यायाम, प्राणायाम किंवा फेरफटका मारण्यास दिला पाहिजे. त्यामुळे शरीर ताजेतवाने राहते आणि अभ्यासात लक्ष केंद्रित करणे सोपे जाते. दिवसभर सतत बसून राहण्यापेक्षा मधूनमधून हलका व्यायाम करावा.



विद्यार्थ्यांशी हितगुज
चंद्रहास शास्त्री सोनपेठकर
पुणे

**५. अभ्यासाची योग्य पद्धत**

परीक्षेच्या वेळी घाईघाईने अभ्यास न करता नियोजनबद्ध वेळापत्रक तयार करावे. सतत अभ्यास करण्याऐवजी थोड्या थोड्या वेळाने ब्रेक घ्यावेत. यामुळे मेंदूला ताण येत नाही आणि स्मरणशक्ती चांगली राहते.

**६. ताण मुक्त राहण्यासाठी पालकांची भूमिका**

पालकांनी मुलांवर अधिक अपेक्षांचा बोजा लादू नये. त्याऐवजी त्यांना आत्मविश्वासाने परीक्षा द्यायला प्रवृत्त करावे. घरातील वातावरण शांत आणि सकारात्मक ठेवावे. योग्य संवाद साधल्यास मुलांमधील भीती कमी होते आणि त्यांचा आत्मविश्वास वाढतो.


परीक्षेच्या काळात शारीरिक आणि मानसिक आरोग्य जपण्यासाठी योग्य आहार, पुरेशी झोप, व्यायाम आणि सकारात्मक विचार महत्त्वाचे असतात. विद्यार्थ्यांनी परीक्षेचा अति ताण न घेता आत्मविश्वासाने अभ्यास करावा. पालक आणि शिक्षकांनीही मुलांना मानसिक आधार देऊन त्यांना प्रोत्साहन द्यावे. निरोगी शरीर आणि शांत मन हे यशस्वी परीक्षेचे खरे गमक आहे.

हा लेख केवळ शैक्षणिक आणि माहितीपर उद्देशासाठी लिहिण्यात आला आहे. विद्यार्थ्यांच्या आरोग्याची काळजी घेताना त्यांच्या वैयक्तिक गरजा, सवयी आणि आरोग्यतज्ज्ञांचा सल्ला याचा विचार करावा. दिलेल्या उपाययोजना सर्वांसाठी उपयुक्त असतीलच असे नाही. कोणत्याही शारीरिक किंवा मानसिक आरोग्यविषयक समस्यांसाठी तज्ज्ञांचा सल्ला घेणे आवश्यक आहे.

# मुलांनो, बापाचे मालक होऊ नका

**ज्योतिर्मय साहित्य**


**बीड** – प्रवासासाठी लेकरांनी दिलेले अवघे ५५ रुपये घेऊन निघालेली वयोवृद्ध व्यक्ती, बसमध्ये जेव्हा भाडेवाढ झाली आहे आणि तिकिटाला ६० रुपये लागतात असे कळल्यानंतर चेहऱ्यावरची हताशा लपविताना त्या व्यक्तीच्या डोळ्यात तराळलेले अश्रू एका वाहकाला अस्वस्थ करून गेले आणि त्याच अस्वस्थतेतून तिकिटाचे पाच रुपये तशी फार मोठी गोष्ट नाही पण मुलांनो, बापाचे मालक होऊ कधी नका हा वाहकाने दिलेला सल्ला सध्या सोशल मीडियावर प्रचंड व्हायरल होतोय. कुपोषित होत चाललेल्या समाजव्यवस्थेने आणि जर्जर झालेल्या कुटुंब व्यवस्थेने याचे आत्मपरीक्षण करण्याची गरज आहे.



ही घटना आहे दोन दिवसापूर्वीची.परळी आगाराचे वाहक गणेश राडकर लातूर-परळी बसवर कर्तव्यास होते.दुपारी २ वाजता लातूरहून बस परळीकडे निघाली. यावेळी गाडीत एक आजोबा येऊन बसले. गाडी काही अंतरावर गेल्यानंतर राडकर यांनी तिकीट काढायला सुरुवात केली. त्या आजोबांना तिकिटाचे पैसे मागितले, यावेळी त्यांनी हाफ तिकिटं सांगत ५५ रुपये हातावर टेकवले, आणखी ५ रुपये द्या असं राडकर त्यांना बोलले. तिकीट तर ५५ रुपये असताना ६० कसे असं त्या आजोबानी विचारले. यावेळी त्यांना बाबा तिकीट वाढल्याचे सांगितले. यावेळी त्यांनी खिशात हात घालून पाहणी केली पण पैसे नसल्याने त्यांनी मुलाने एवढेच पैसे खर्चीसाठी दिल्याचे सांगितले, हे सांगताना त्या आजोबाच्या नजरेत एक प्रकारची हताशा होती. ती हताश आणि चेहऱ्यावरची हतबलता, डोळ्यात तराळणारे पाणी वाहक राडकर यांना अस्वस्थ करून गेली आणि त्यांनी या घटनेचा उल्लेख करून खरं तर एवढ्या उन्हात प्रवास करताना तहान, भूक लागू शकते असं विचार न करता केवळ ५५ रुपये बापाच्या हातावर टेकवणाऱ्या मुलाचा विचार सतत मनात घोळत होता. तिकिटाचे पाच रुपये तशी फार मोठी गोष्ट नाही पण मुलांनो, बापाचे मालक होऊ नका कधी असा सल्ला देणारी पोस्ट सोशल मीडियावर टाकली.

गणेश राडकर यांनी लातूर-परळी बसमधील वयोवृद्ध आजोबांचा शेयर केलेला किस्सा आज अनेकांसाठी चर्चेचा विषय ठरत आहे.

मनातली सल केली व्यक्त आज आपण मोठे झालो.आपल्याकडे वडिलांनी व्यवहार दिला तर आपण बापालाच मोजके पैसे द्यावेत? ज्या बापाने लहानपणी सर्व लाड पुरवले, पैसे असोत नसोत मागेल तितके म्हणेल तेंव्हा पैसे पुरवले त्याच बापावर आज अशी वेळ... मोजून तिकीटा एवढेच पैसे ...? सध्या उन्हाळा सुरु आहे, तहान लागू शकते अशा वेळेस त्यांनी काय करावे...कोणाला मागावे..? ५ रू माझ्यासाठी मोठी रक्कम नव्हती, मी ती भरली पण अशी परिस्थिती पाहून खूप वाईट वाटले. गाडी लातूरवरून परळीला आली पण माझ्या मनात ती गोष्ट सारखी सलत होती. म्हणूनच मित्रानो कोणीच बापाचे मालक होवू नका, त्यांना मागितल्यापेक्षा जास्त पैसे द्या अशी भावना गणेश राडकर यांनी सोशल मीडियावर व्यक्त केली.





# शाळा सुटली...पाटी फुटली...

**ज्योतिर्मय साहित्य**

हे त्या काळात आवडत असले तरी बापाच्या धाकाने ते म्हणण्याचे धैर्य नसलेले अनेकजणं आणि त्या अनेकजणांपैकी तो एक...

शाळा सुटली आणि पाटी पण सुटली ! तशी आधीच पण बोलायची पद्धत म्हणून ! म्हणजे तो पास होऊन कॉलेज मध्ये जाऊ लागला. बाप समोर कधी कधी कौतुक करायचा पण त्यात उपदेशच जास्त असायचा. एकदा चुकून म्हणाला त्याला की तू आता मोठा झाला आहेस! तुझे तुला काय करायचे ते ठरव. कॉलेज संपले की दुकानात बसायचे...



सतीश इंदापूरकर

शाळेत असतांना अनेक विषयांच कडबूळ शिकावं लागते. त्यामध्ये विज्ञानात गाजर या विषयी अभ्यास म्हणून माहिती झाली होती. गाजर फार पौष्टिक, आरोग्यासाठी फायदेशीर आणि बरेच काही...

तसेच मराठी भाषेत वेगळ्या अर्थाने गाजर या विषयी माहिती दिली गेली. त्यात ते वाक्प्रचार पण ! एकदा त्याचा बाप त्याला काहीतरी सांगत असतांना म्हणाला की जर तू असे केले तर तुला, त्याने उत्तर देतांना म्हणाला उगीचच गाजर नका दाखवू. बापाने मस्त वेगळाच अर्थ पाठीवर समजावून सांगितला होता...

तर शाळेत असतांना गाजर विषयी खूपच चांगला अभ्यास झाल्यामुळे कॉलेज मध्ये त्याचा योग्य उपयोग करायला सुरुवात होते.

त्याचे तसेच झाले ! त्याला एक मुलगी फार आवडली, आता आवडली की प्रेमात पडायचे एव्हढी अक्कल येतेच ! हे आपल्याला कोणी शिकवत नाही किंबहुना हे शिकायची गरज पडत नाही. प्रेमात पडला आणि गाजराचे महत्व वेगळ्याच अर्थाने समजून आले...

प्रेमात पडला त्यामुळे ती भेटली की दाखव गाजर ! असा तीन वर्षे लग्नाच्या आधी दाखविण्याचा कार्यक्रम सुरु असल्यामुळे चहा, पोहे कार्यक्रम करावा लागला नाही. फक्त गाजर दाखवून प्रेम आणि लग्न झालेल्या भाग्यवंतापैकी तो एक ते अशासाठी की यांना प्रेमात गुलाबाच्या फुलाचा वापर करावाच लागला नाही कारण अर्थात गाजर ! तूच माझा गुलाब असे कुजबुजले की झाले...

तर मग लग्न होते ! प्रेम आणि संसार दोन्ही मध्ये असलेला फरक समजून येतो. मुख्य म्हणजे गाजराचा काही उपयोग होत नाही. काही महिन्यानंतर एक दिवस त्याची बायको गाजरी हलवा करते.तो सहज म्हणाला, अरे व्वा ! आज गाजरी हलवा ! ती पण लगेच म्हणाली, तुम्ही ३ वर्षे गाजर दाखवत होता म्हणून ! तो काहीच बोलला नाही कारण काही बोलला असता तर गाजराची पुंगी वाजतच राहीली असती !

त्याला खरं तर गाजर बिलकुल आवडत नसे...

पण सांगतो कोणाला? गाजर दाखवले आपण गंडवले जातो आनंदाने हे माहित असल्यामुळे...

हात दाखवून अवलक्षण ही म्हण त्याच्याकडे बघून हसत होती...

आणि जोडीला नवीन म्हण होती...

गाजर दाखवून अवलक्षण...




हे जरनल संपादक व प्रकाशक संजय व्यापारी यांनी १०१, सी विंग, सिल्व्हर स्पेस सोसायटी, विशाल नगर, पिंपळे निलख, पुणे-४११००१ (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. (पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद पुणे न्यायालयाच्या कक्षेत) E-mail-jyotirmaysahitya@gmail.com, Mob. 7743918559